महाज्योती
— ज्ञानदीप सतंतीचा —

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती, नागपूर/ आस्था/ 2253/2023-24 दिनांक:-27/10/2023

# परीपत्रक

## MBA-CAT/CMAT-CET-2023 परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी प्रतिक्षा यादी

महाज्योती या संस्थेद्वारे MBA-CAT/CMAT-CET -2023 परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षण करीता दि.18/10/2023 रोजी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता महाज्योतीच्या संकेतस्थळावर परीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. एकूण 750 विद्यार्थ्यांपैकी एकूण-506 विद्यार्थी प्रशिक्षण केंद्रात रुजु झालेले आहेत. त्यामुळे उर्वरीत रिक्त जागांकरीता संस्थानिहाय **सीआरजी ॲकडमी, पुणे** येथे -69 विद्यार्थी, **स्पेक्ट्रम अकॅडमी, पुणे** येथे -68 विद्यार्थी तसेच **ज्ञानज्योती स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे** येथे -68 विद्यार्थी असे एकूण-205 विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी दि.27/10/2023 रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. MBA-CAT/CMAT-CET -2023 करीता ऑफलाईन प्रशिक्षण दि.25/10/2023 रोजी पासून प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे दि.02/11/2023 पर्यंत विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या प्रशिक्षण केंद्रात जावून प्रवेश प्रक्रीया पूर्ण करुन घ्यावी. दि.02/11/2023 रोजी नंतर प्रवेश घेता येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-

1. आधारकार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र
3. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
4. पदवी उत्तीर्ण गुणपत्रिका /प्रमाणपत्र/ उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता-संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे:-**

**सीआरजी ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र-**

**राहूल जाधव**- 7666878067/9923268491

**पत्ता**- 3 रा माळा, फाडके हॉल, खजीना वीर चौक, क्रांतीवीर वासूदेव फाडके मार्ग, सदाशिव पेठ, पुणे - 411030

**स्पेक्ट्रम अकॅडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र-**

**सुनिल पाटील** - 7774076890/91

**पत्ता-** 1 ला माळा, विठ्ठल प्रसाद बिल्डींग, अल्का टॉकीज च्या शेजारी, सदाशिव पेट, पुणे-441030

**ज्ञानज्योती स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र-**

**विशाल भेंडुरकर**- 9975806127/7887992834/5

**पत्ता-** विठ्ठल प्रसाद बिल्डींग, अल्का टॉकीज जवळ, सदाशिव पेट, पुणे -411030

**रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना:-**

- प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना MPSC/UPSC किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रकीया करु नये. तसेच प्रवेश प्रक्रीया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
- कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी'या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांची MBA-CAT/CMAT-CET व UGC-NET/SET परीक्षा पूर्व प्रशिक्षण करीता निवड झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी कोणत्याही एका प्रशिक्षणाकरीता प्रवेश प्रक्रीया पुर्ण करावी.
- कोणत्याही कारणाने परीक्षा केंद्रात बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर